**एफएल/बीआर-2 अनुज्ञप्ती (बंद बॉटलमधुन बिअर विक्रीकरीता ) लागणारी कागदपत्रे.**

| | |
|---|---|
| 1 | विहीत नमुना एफएल/अे-10 या नमुन्यांमध्ये परिपूर्ण माहिती भरणा केलेला अर्ज रु.5/- च्या कोर्ट फी स्टॅम्पसह |
| 2 | शासकीय कोषागारात भरणा केलेले रु.100/- चलन. |
| 3 | जागा मालकीचा पुरावा - खरेदीखताची छायाकिंत प्रत/नमुना सात बारा |
| 4 | जागा भाडयाची असल्यास भाडे करारनामा किमान 5 वर्षाकरीता व नोटरी असावा. तसेच जागा मालकाचे त्यांनी भाडयाने दिलेल्या जागेवर अर्जदारास बिअर व्यवसायाकरीता संमती दिल्याबाबत रु.100/- स्टॅम्पपेपरवर नोंदणीकृत केलेले भाडेकरार नामा/समत्तीलेख. |
| 5 | जागेवरील बांधकाम अधिकृत असल्याबाबत सचिव ग्रा.पं./मुख्याधिकारी न.प. चा प्रमाणपत्र. |
| 6 | प्रस्तावित केलेली जागा वाणिज्य वापरासाठी मंजूर असल्याबाबत आदेशाची प्रत. |
| 7 | प्रस्तावित केलेल्या जागेचा निळ प्रतीत 4 नकाशाची प्रत. |
| 8 | आवेदकावर आयकर / विक्रीकर / राज्य शासनाची थकबाकी नसल्याबाबत तसेच स्वत:च्या किंवा कुटूबातील व्यक्तीच्या नावे अबकारी विभागाची कोणतीही अबकारी अनुसूचीत अनुज्ञप्ती नसल्याबाबतचे रु.100/- च्या स्टॅम्पपेपरवर केलेले नोंदणीकृत प्रतिज्ञापत्र. |
| 9 | सक्षम प्राधिका-याकडून निर्गमीत केलेले आवश्यकतेनुसार रकमेचे ऐपतपत्र. |
| 10 | मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, 2004 चे नियम 25 च्या उप नियम (2) व (3) आणि 26 ते 42 मधील एफएल-2 अनुज्ञप्तीकरीता लागू असलेल्या नियमातील सर्व तरतूदी जशाच्या तशा एफएल/बीआर-2 अनुज्ञप्तीसाठी लागू राहतील. |
| 11 | ज्या विभागामध्ये बीयरची विक्री करण्यासाठी दुकानास एफएल/बीआर-2 अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येणारी आहे , त्या विभागातील एफएल-3 अनुज्ञप्ती (परवानाकक्षाची अनुज्ञप्ती) मंजूरीसाठी किंवा नुतनीकरणासाठी असलेल्या अनुज्ञप्ती फी च्या 25 टक्के अनुज्ञप्ती फी आकारुन एफएल/बीआर-2 अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येईल व वार्षिक अनुज्ञप्ती फी इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन वसूल करण्यात येईल. |
| 12 | एफएल/बीआर-2 अनुज्ञप्ती मंजूरीकरीता आवेदकाचे चारीत्र्य अनुकुल असणे आवश्यक राहील. |
| 13 | ग्रामसभेने ठरावाद्वारे दिलेले ना हरकत प्रमाणपत्र. (ग्रामपंचायत करिता लागु) |